# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : सोमवार ०४ नोव्हेंबर २०१७
**स्थळ** : १४ कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – ४०० ०५३.

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री मंगेश मनोहर राणे | 6. श्री गुरुनाथ गणपत राणे (आमंत्रित) |
| 2. श्री सुनिल सदानंद राणे | 7. श्री सुनिल विनायक राणे (आमंत्रित) |
| 3. श्री दशरथ दत्ताराम साटम | 8. श्री प्रविण मधुकर राणे (आमंत्रित) |
| 4. श्री हेमंतकुमार रमेश राणे | 9. श्री संतोष मोहन राणे (आमंत्रित) |
| 5. श्री भरत गणपत राणे | |

फळसेवाडी हितकारी संस्थेच्या कार्यकारिणीची सभा संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांचे निवासस्थानी (शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल येथे) घेण्यात आली. सभेस कार्यकारीणीतील ५ सदस्य तसेच आमंत्रितांपैकी ४ आमंत्रित ग्रामस्थ  उपस्थित होते.

श्री सुनिल सदानंद राणे, सचिव यांनी प्रथम उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरवात करताना सचिवांनी विषयपटलावरील विषय उपस्थितांस वाचून दाखविले.

**<u>विषय क्रमांक १</u>**  अंर्तगत सचिवांनी दिनांक १७ जून २०१७, १२ ऑगष्ट २०१७ आणि  ०२ ऑक्टोबर २०१७ रोजी घेण्यात आलेल्या कार्यकारीणी सभांची इतिवृत्ते उपस्थितांना वाचून दाखविली. उपस्थिताकडून इतिवृत्तांमध्ये कोणत्याही सुचना / सुधारणा नसल्यामुळे ही इतिवृत्ते मंजूर करण्यात आली.

**<u>विषय क्रमांक २</u>** अंर्तगत सचिवांनी माहीती दिली की मागील दिनांक ०२ ऑक्टोबर २०१७ झालेल्या कार्यकारीणी सभेनंतर महिण्याभरात कोणतेही लक्षणीय काम संस्थेतर्फे करण्यात आलेले नाही.

**<u>विषय क्रमांक ३</u>** अंर्तगत सभासद नोंदणी मोहिमेचा आढावा घेतांना सचिवांनी उपस्थितांस माहीती दिली की आजपर्यंत एकूण ३० ग्रामस्थांकडून सभासद नोंदणीस प्रतिसाद मिळाला असून त्यांचेकडून संस्थेचे सभासद नोंदणीचे फार्म भरून आलेले आहेत. या ३० ग्रामस्थांपैकी नवीन सभासद होऊ इच्छिणारे ग्रामस्थ २० आहेत.

सचिवांनी पुढे माहीती दिली दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी सभासदांच्या थकबाकीची रक्कम रु.६६,३९५/- (रुपये सहासष्ट हजार तीनशे पंच्यान्नव फक्त) होती त्यापैकी १६ जुन्या सभासदांकडून थकबाकीचा भराणा झाला असून भराणा झालेली रक्कम रु.११,४५०/- (रुपये अकरा हजार चारशे पन्नास फक्त) इतकी आहे.

सचिवांनी पुढे माहीती दिली की सभासद नोंदणी मोहिमे अंर्तगत रु.४४,५७०=५५ (रुपये चव्वेचाळीस हजार पाचशे सत्तर आणि पैसे पंचाव्वन्न फक्त) इतकी रक्कम जमा झालेली असून त्यापैकी रु.५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) ही

रक्कम श्री रंजन रावजी म्हसकर यांचेकडून देणगी म्हणून प्राप्त झालेली आहे. तसेच दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी खजिनदारांकडे शिल्लक असलेली रु.९,३२०=५५ (रुपये नऊ हजार तीनशे वीस आणि पैसे पंचाव्वन्न फक्त) ही रक्कम खजिनदारांनी बँक खात्यामध्ये जमा करण्यासाठी दिली आहे. उपस्थितांच्या माहीतीसाठी दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ पर्यंत जमा झालेल्या रक्कमेचा तपशील खालील प्रमाणे असल्याचे आहे –

| | | |
|---|---|---|
| १. | दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी खजिनदारांकडे रोख शिल्लक | ९,३२०=५५ |
| २. | श्री रंजन रावजी म्हसकर यांचेकडून संस्थेस देणगी | ५,०००=०० |
| ३. | सभासदांकडून ३१ मार्च २०१७ पर्यंत येणे असलेली वर्गणी जमा | ११,४५०=०० |
| ४. | नविन सभासद प्रवेश फी (२० सभासदांकडून) | २,०००=०० |
| ५. | साल २०१७ – १८ ची वार्षिक वर्गणी (२८ सभासदांकडून) | १६,८००=०० |
| | **दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ पर्यत जमा झाले** | **४४,५७०=५५** |

सचिवांनी सांगितले की जमा झालेली रक्कम वेळोवेळी संस्थेच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आलेली आहे.

सचिवांनी पुढे सांगितले की कार्यकारीणी सदस्य अजूनपर्यंत ग्रामस्थांपर्यत पोहोचल्याचे दिसत नाही कारण सभासद नोंदणीस मिळालेला प्रतिसाद तितकास उत्साहवर्धक नाही. ग्रामस्थांशी संर्पकादरम्याण ग्रामस्थांकडून काही प्रश्न विचारण्यात आल्यास किंवा ग्रामस्थांनी संस्थेस सहभागी होण्यास नकार दिल्यास आपण कार्यकारीणीच्या निर्दशनास ही बाब आणून द्यावी जेणेकरून पुन्हा एकदा एकत्रिपणे त्या ग्रामस्थाची भेट घेऊन त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न करता येईल. आपणांस स्वबळावर प्रायोजित कामे पूर्ण करावयाची असल्यामुळे कार्यकारीणी सदस्यांनी लवकरात लवकर सर्व ग्रामस्थांशी पोहचून सभासद नोंदणी अभियान पूर्णत्वास नेण्यास सहाय्य करावे.

**<u>विषय क्रमांक ४</u>** अंर्तगत सचिवांनी माहीती दिली मागील सभेनंतर कोणाही ग्रामस्थाकडून संस्थेची पत्रव्यवहार झालेला नाही.

**<u>विषय क्रमांक ५</u>** अंर्तगत सचिवांनी उपस्थितांना सुचनासंबधी विचारणा केली असता श्री प्रविण मधुकर राणे यांनी सूचना केली की वाडीतील रस्तेबांधणीसाठी पेव्हर ब्लॉक वापरण्याचा विचार व्हावा. या सूचनेवर उपस्थितांची संमत्ती असल्यामुळे श्री प्रविण मधूकर राणे यांस सूचना करण्यात आली की त्यांनी रस्त्याची रुंदी विचारात घेऊन प्रत्येक मीटर रस्ताबांधणीस किती खर्च येईल याचे अंदाजपत्र कार्यकारीणीस सादर करावे. तसेच पेव्हर ब्लॉक्स सवलतीच्या दरात मिळू शकतील का ? याचीही विचारणा करावी. श्री प्रविण मधूकर राणे यांनी पुढे विचार मांडला की फळसेवाडी शाळा क्रमांक २ पासून वाडीवर येणाऱ्या रत्यावर दिवाबत्तीची सोय नाही त्यामुळे शक्य असल्यास रस्त्याच्या बाजूला ठराविक अंतरावर पथदिवे लावण्याचा विचार व्हावा.

श्री प्रविण मधूकर राणे यांनी पुढे सांगितले की त्यांच्या घराच्या बांधकामाच्या निमित्ताने ते डिसेंबर महिण्याच्या २० तारखेच्या दरम्याण गावी जाणार असून त्यावेळी ते त्यांच्या कंत्राटदारास बांधावयाच्या टाकीसंबधी विचारणा करतील. यावर श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी सुचविले की शक्यतो आपण ही टाकी लेबर कॉन्ट्रक्ट देऊन बांधून घेऊया. या विषयावर श्री मंगेश मनोहर राणे यांनी सांगितले की ते देखिल डिसेंबर महिण्याच्या तिसऱ्या आठवड्यानंतर काही दिवस गावी वास्तव्यास जाणार आहेत त्यावेळी टाकीचे काम सुरू केल्यास ते त्यावर देखरेख करू शकतील.

सचिवांनी उपस्थितांस माहीती दिली की नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणूकीमध्ये श्री सुहास राणे यांची पिसेकामते ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून बहूमताने निवड झाली आहे. सचिवांनी त्यानंतर श्री सुहास राणे यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला व तो सर्वानुमते संमत करण्यात आला.

आजच्या सभेस असलेली उपस्थितीची नोंद घेऊन सचिवांनी सांगितले की या सभेस मुंबईस्थित १३ कार्यकारीणी सदस्यांपैकी फक्त ५ सदस्य तसेच ११ आमंत्रित ग्रामस्थांपैकी फक्त ४ ग्रामस्थ उपस्थित आहेत ही बाब नक्कीच संस्थेस भुषणावह नाही. सचिवांनी उपस्थितांच्या निर्दशनास आणले की कार्यकारीणी सदस्यांकडून तसेच आमंत्रित ग्रामस्थाकडून वाडीच्या फार अपेक्षा आहेत त्यामुळे सुरवातीच्या काळी दोन महीण्यातून एकदा घेण्यात येत असलेल्या कार्यकारीणीच्या सभेस त्यांनी वेळात वेळ काढून आर्वजून उपस्थित राहावयास हवे तरच गेली २ ते ३ दशके अपूर्ण राहिलेली रस्ता व पाणीपुरवठा ही कामे मार्गी लागू शकतील.

त्यानंतर सचिवांनी उपस्थितांचे आभार मानले तसेच आजच्या सभेस जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल तसेच उपस्थितांचा चहापाण्याचा खर्च उचलल्याबद्दल श्री मंगेश मनोहर राणे यांचे उपस्थितांच्या वतीने आभार मानले.

त्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने सचिवांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

---

श्री सुनिल सदानंद राणे
सचिव

श्री मंगेश मनोहर राणे
अध्यक्ष